गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ४९ वा ● बुधवार ०५ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 49 | Date : 05/07/2023 | blow : Wednesday |Page 4 |Price 4


## राष्ट्रवादीतील दोन्ही गटांची आज बैठक

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर आता दोन्ही गट राष्ट्रवादी पक्ष हा आपलाच असल्याचा दावा करत आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे सर्व खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख आणि प्रदेश प्रतिनिधींना बुधवारी वांद्रे येथे बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. यादरम्यान, शरद पवारांनी त्याचदिवशी म्हणजे ५ जुलै रोजी सर्व सदस्यांना वाय.बी. चव्हाण सभागृहात बैठकीसाठी बोलावले आहे. अजित पवार म्हणजे पक्ष नव्हे, असे सोमवारी पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट केले होते. तर पक्षाची बैठक घेणार असल्याचेही जाहीर केले होते. यानंतर अजित पवार यांनी ५ जुलै रोजी बैठक घेण्यात येईल, असे जाहीर केले आहे. आता बुधवारी अजित पवारांच्या बैठकीला कोण उपस्थित राहणार याची चर्चा रंगली आहे. तसेच या बैठकीला उपस्थित राहणाऱ्या आमदारांचे अजित पवारांना समर्थन असल्याचेही स्पष्ट होणार आहे. दरम्यान, शरद पवारांनी त्याचदिवशी म्हणजे ५ जुलै रोजी सर्व दस्यांना वाय.बी. चव्हाण सभागृहात बैठकीसाठी बोलावले आहे.

राज्याचे हरित हायड्रोजन धोरण जाहीर, मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

# हरित हायड्रोजन धोरण जाहीर, ८ हजार ५०० कोटींस मान्यता



**मुंबई: नवीकरणीय ऊर्जा आणि हरित हायड्रोजनच्या प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हरित हायड्रोजन धोरण मंजूर करण्यात आले. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी ८ हजार ५६२ कोटी रुपये खर्चास देखील मान्यता देण्यात आली. प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन जाहीर केले असून, २०२३ पर्यंत देशात ५ मिलीयन टन हरित हायड्रोजन दरवर्षी निर्मित करण्याचे उद्दीष्ट आहे.**

राज्यामध्ये देखील हरित हायड्रोजन आणि संबंधित उत्पादनांची क्षमता ओळखून, हे धोरण तयार करण्यात आले आहे. राज्याची सध्याची हायड्रोजनची मागणी दरवर्षी ०.५२ मिलीयन टन इतकी आहे. ही मागणी २०३० पर्यंत १.५ मिलीयन टनांपर्यंत पोहचू शकते. हरित हायड्रोजन प्रकल्पांसाठी असलेल्या जमिनीला स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर, अकृषिक कर व मुद्रांक शुल्कातून पूर्ण सवलत देण्यात येईल. हरित हायड्रोजन कक्षासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ घेणे, त्यांचे प्रशिक्षण, कौशल्य विकास, एक खिडकी सुविधा इत्यादी बाबींकरिता वार्षिक ४ कोटी याप्रमाणे १० वर्षांसाठी ४० कोटी रुपये खर्चास मान्यता दिली.। **पान २ वर**

## युवकांना सक्षम करण्यासाठी भगवान बुद्धांची शिकवण : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

नवी दिल्ली : युवकांनी स्वतःला अधिक समृद्ध करण्यासाठी आणि एक शांततामय समाज, राष्ट्र आणि जग उभारण्यासाठी भरीव योगदान देण्याकरिता भगवान बुद्धांची



शिकवण अंगीकारावी असे आवाहन भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. आषाढ पौर्णिमेला, धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिलेल्या ध्वनिमुद्रित संदेशात राष्ट्रपती म्हणाल्या की भगवान बुद्धांच्या शील, सदाचार आणि प्रज्ञा या तीन शिकवणींचे आचरण करून युवा पिढी स्वतःला अधिक समृद्ध करू शकते आणि समाजात सकारात्मक परिणाम घडवून आणू शकते.आषाढ पौर्णिमेच्या दिवशी आपल्याला भगवान बुद्धांच्या धम्माची ओळख झाली जो केवळ आपल्या प्राचीन वारशाचा एक भाग नव्हे तर आपल्या दैनंदिन आयष्याचा एक महत्वाचा घटक आहे, बुद्ध धम्माबद्दल अधिक जाणून घ्यायचे असेल तर आपल्याला सर्वप्रथम शाक्यमुनींनी सारनाथच्या पवित्र भूमीवर दिलेला पहिला उपदेश जाणून आणि समजून घेतला पाहिजे.भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालया अंतर्गत आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघ (IBC) द्वारे आयोजित समारंभाला संबोधित करताना राष्ट्रपती म्हणाल्या, या पवित्र दिवशी आपण बुद्धांची शिकवण आपल्या विचारांत आणि आचरणात आणणे महत्वाचे आहे. सांस्कृतिक आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री, मीनाक्षी लेखी, यांनी त्यांच्या विशेष भाषणात एका सामान्य माणसाच्या बोधिसत्वाचा स्तर प्राप्त करण्यापर्यंतच्या प्रवासाबाबत सांगितले. जरी आपण सर्व आपल्या मूल्यांनी जोडलेले असलो तरी आपण आपल्या स्वतःच्या कृतींसाठी जबाबदार आहोत, योग्य कृती आपले विधिलिखित बदलू शकते.परमपूज्य १२ व्या चामगोन केंटिंग ताई सितुपा यांनी आषाढ पौर्णिमेच्या महत्त्वावरील धम्म भाषणात सांगितले आहे की, आम्ही बुद्धाच्या पहिल्या शिकवणीचा उत्सव साजरा करतो.

## व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत ७ रुपयांची वाढ

नवी दिल्ली : एप्रिल, मे आणि जूनमध्ये सलग तीनवेळा किमतीत कपात केल्यानंतर व्यावसायिक एलपीजीच्या किमतीत सात रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. तेल कंपन्यांनी ही वाढ जाहीर केली आहे. व्यावसायिक सिलिंडरची किंमत १,७७३ रुपयांवरून १,७८० इतकी वाढली आहे. दुसरीकडे, घरगुती एलपीजीच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. यादरम्यान या वर्षी मार्च महिन्यात घरगुती गॅसच्या किमतीत ५० रुपयांनी वाढ करण्यात आली होती. सुदैवाने तेल कंपन्यांनी घरगुती एलपीजीच्या किमतीत कोणताही बदल केला नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## ८ जुलैपर्यंत देशातील अनेक राज्यांमध्ये पडणार मुसळधार पाऊस

नवी दिल्ली : संपूर्ण देशात मान्सूनचे आगमन झालं आहे. त्यामुळं सध्या देशातील विविध राज्यात पाऊस पडत आहे. विशेषत: उत्तर भारतात सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील चार दिवस म्हणजे ८ जुलैपर्यंत देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावासाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागानं दिलेल्या



माहितीनुसार, कोकण, गोवा आणि महाराष्ट्रात ५ आणि ६ जुलैला, गुजरातमध्ये ७ जुलैला पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय इतर ठिकाणी मुसळधार ते अतिवृष्टीची शक्यता आहे. ज्यामध्ये आसाम, मेघालय, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तसेच पूर्व उत्तर प्रदेश, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल तसेच सिक्कीम, तामिळनाडू, पुडुचेरीत आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ओडिशा राज्यात ६ जुलै रोजी मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात। **पान २ वर**

शरद पवारांची अजित पवारांना तंबी

## माझ्या विचाराशी गद्दारी करणाऱ्यांना फोटो वापरण्याचा अधिकार नाही..

मुंबई : राज्यभरात पोस्टर लावताना शरद पवारांचा फोटो लावा, असे आदेश अजित दादांचे कार्यकर्त्यांना दिले होते. त्यावर आज शरद पवार यांनी स्पष्ट शब्दात प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या विचारांशी गद्दारी करणाऱ्यांनी माझे फोटो लावू नयेत, अशी तंबी शरद पवारांनी दिली आहे. त्याशिवाय अजित पवार यांच्यासोबत गेलेल्या कोणतेही नेत्याचा फोटो फ्लेक्सवर वापरायचा नाही, असे आदेश शरद पवारांनी कार्यकर्त्यांना दिल्याचे सुत्रांनी सांगितले आहे.

माझ्या विचारधारेशी गद्दारी करणाऱ्यांना माझे छायाचित्र वापरण्याचा अधिकार नाही, अशी तंबी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली. अजित पवार यांनी काही आमदारांना हाताशी घेत सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय



घेतला. अजित पवार आणि आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर अजित पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. शपथविधी झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना शुभेच्छांच्या होर्डिंगवर शरद पवार यांचे फोटो लावण्याचे आदेश दिले होते. आज शरद पवार यांनी आपल्या शैलीत अजित पवारांना खडसावले आहे. माझ्या विचारांशी गद्दारी करणाऱ्यांना फोटो वापरण्याचा अधिकार नाही, असे शरद पवार म्हणाले आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांच्यासोबत गेलेल्या नेत्यांचे फोटो प्लेक्सवर लावू नका, असा आदेश शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. पक्षातून निघून गेलेल्या नेत्यांविरोधात मैदानात उतरून जोरदार लढाईची तयारी शरद पवार यांच्याकडून सुरु आहे. आता कोणतेही परिस्थितीमध्ये माघार न घेता आगामी। **पान २ वर**

## थरारक! पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताचा कुवेतवर ५-४ ने विजय, मैदानात चक दे इंडियाचे नारे




नवी दिल्ली : श्वास रोखायला लावणाऱ्या सामन्यात भारताने कुवेतवर विजय मिळवला आहे. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताने कुवेतचा पराभव केला. पेनल्टी शूटआऊटमध्ये सामना जिंकत भारतानें रिषष लहरा- ळिपीहळ चिषकावर नाव कोरले. भारताने १४ वर्षात नवव्यांदा रिषष लहराळिपीहळ चिषकावर नाव कोरलेय. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताने कुवेतचा पराभव करत saff championship चषकावर नाव कोरल्यानंतर चक दे इंडिया आणि वंदे मातरम् आवाजांनी मैदानात चाहत्यांनी आनंद साजरा केला. दक्षिण आशियाई फुटबॉल। **पान २ वर**

## मुंबईकर निवडणार टीम इंडियाचा संघ, अजित आगरकर निवड समितीचा नवा अध्यक्ष

मुंबई : भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर याची भारतीय क्रिकेट संघाच्या निवड समितीचा अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. बीसीसीआयने ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे. अजित आगरकर याने याआधी मुंबई संघाच्या निवड समितीचे अध्यक्षपदही भूषावले आहे. त्याशिवाय तो आयपीएलमध्ये दिल्ली संघाचा गोलंदाजी कोच होता. निवड समितीसाठी आलेल्या अर्जदारामध्ये अजित आगरकर याचा अनुभव सर्वात जास्त होता. त्यामुळे त्याची निवड करण्यात आल्याचे बीसीसीआयने सांगितले.

जतिन परांजपे, अशोक मल्होत्रा आणि सुलक्षणा नायक या सीएसी समितीने निवड समितीच्या अध्यक्षासाठी मुंबईत मुलाखती घेतल्या. यामध्ये त्यांनी अजित आगरकर याची मुख्य निवड समितीचा अध्यक्ष म्हणून




निवड केली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अजित आगरकर ११ फर्स्ट क्लास सामने, २७० लिस्ट ए सामने आणि ६२ टी २० सामने खेळला आहे. दक्षिण आफ्रिका येथे २००७ मध्ये धोनीच्या नेतृत्वात भारताने टी २० विश्वचषकावर नाव कोरले होते, त्या संघाचा अजित आगरकर सदस्य होता. एकदिवसीय सामन्यात सर्वात वेगवान अर्धशतक झळकावण्याचा विक्रम अद्यापही अजित आगरकर याच्या नावावर आहे. त्याने २१ चेंडूत अर्धशशतक झळकावले आहे. त्याशिवाय वनडेमध्ये सर्वात वेगवान ५० विकेट घेण्याचा। **पान २ वर**

## राजकीय पक्ष आता त्यांचे वित्तीय लेखा ऑनलाइन सादर करू शकणार : भारत निवडणूक आयोग

नवी दिल्ली : निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांसाठी देणगी अहवाल, लेखा परीक्षित वार्षिक लेखा आणि निवडणूक खर्चविषयक विवरण या तीनही प्रकारचे अहवाल सादर करण्यासाठी एक वेबपोर्टल (https://iems.eci.gov.in/) सुरु केले आहे. यामुळे राजकीय पक्ष आता त्यांचे वित्तीय लेखा ऑनलाइन पद्धतीने सादर करू शकतील. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ नुसार आणि भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या पारदर्शकतेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राजकीय पक्षांना ही सर्व आर्थिक विवरणपत्रे, निवडणूक आयोग / राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असेल.

निवडणूक आयोगाने हा अहवाल प्रत्यक्ष स्वरूपात सादर करण्यात राजकीय पक्षांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि दुसरे म्हणजे या आर्थिक विवरणपत्रांचे विहित किंवा प्रमाणित स्वरूपात मुदतीच्या आत सादरीकरण सुनिश्चित करणे, ही दोन उद्दिष्टे लक्षात घेऊन ही सुविधा तयार केली आहे. या डेटाच्या ऑनलाईन




उपलब्धतेमुळे अनुपालन आणि पारदर्शकतेचा स्तर वाढेल, अशी अपेक्षा सर्व राजकीय पक्षांना लिहिलेल्या पत्रात नमूद केली आहे. या ऑनलाईन पोर्टल मध्ये राजकीय पक्षांच्या अधिकृत प्रतिनिधींना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि नोंदणीकृत ई मेल आयडी वर संदेशाच्या स्वरूपात स्मरणपत्रे पाठवण्याची देखील सुविधा आहे, त्यामुळे ते मुदतीच्या आत अहवाल सादर करू शकतील. ऑनलाइन मॉड्यूल आणि ऑनलाइन अहवाल दाखल करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात ग्राफिकल सादरीकरण असलेली एक सर्वसमावेशक मार्गदर्शक पुस्तिका आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि उत्तरेदेखील राजकीय पक्षांना पाठवण्यात आले आहे. ऑनलाईन सादरीकरणाबाबत अधिक मार्गदर्शन करण्यासाठी, भारत निवडणूक आयोगाने विविध राजकीय पक्षांकडून नियुक्त केलेल्या व्यक्तींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले आहेत.

जे राजकीय पक्ष आपले आर्थिक अहवाल। **पान २ वर**

## * सुविचार *

गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.


## संपादकीय

### सतर्कता दाखवावी..

सर्वसामान्य विविध प्रश्नांना तोंड देत आहेत. अशातच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याची तर आता गुन्हेगारीचे केंद्र अशी ओळख निर्माण झाली. कोयता गँगची दहशत तर आहेच, त्यातच येथे मुली, महिला सुरक्षित नसल्याचेही विविध दुर्घटनांद्वारे दिसत आहे. अलीकडेच एका तरुणीवर तरुणाने केलेला जीवघेणा हल्ला हे त्याचे ताजे उदाहरण आहे. एकतर्फी प्रेमातून एमपीएससीच्या विद्यार्थिनीवर एका तरुणाने जीवघेणा हल्ला केला. सतर्क नागरिकांनी दाखवलेल्या, विशेषत: लेशपाल जवळगे आणि हर्षद पाटील या दोन तरुणांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे त्या तरुणीचा जीव वाचला. या घटनेच्या साधारण पंधरा दिवस आधी पुण्यातच २६ वर्षीय दर्शना पवार हिची हत्या तिचाच मित्र राहुल हंडोरे याने केल्याचे समोर आले होते. राजगडाच्या पायथ्याशी तिचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला होता. पुरोगामित्व, महिला स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता आणि अंधश्रध्दा निर्मूलन यासारख्या इतर अनेक चळवळींचे माहेरघर असलेल्या महाराष्ट्रात अशा घटना घडणे, हे अयोग्यच आहे. अशा घटना घडल्यानंतर सर्वाधिक बंधने येतात, ती मुली आणि महिलांवर. एकटे-दुकटे बाहेर जाण्यावर, रात्री उशिरा जास्त वेळ बाहेर राहण्यावर, कुठल्या कार्यक्रमांना जाण्याबाबत, नाट्य-चित्रपटांचे उशिराचे खेळ पाहण्यावर निर्बंध येतात. प्रत्यक्षात अशा नराधमांना वचक बसण्याची गरज आहे. पुण्यातील गुन्हेगारीचा आलेख चढाच राहिला आहे, त्यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. आयटी हब असलेले पुणे गुन्हेगारीचे केंद्र बनू नये, असे अपेक्षित आहे. पण, आता पुण्याच्या या घटनेवरून कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करत राजकीय शरसंधान सुरू आहे. पण, त्याला अर्थ नाही. प्रत्येक ठिकाणी पोलीस असलेच पाहिजेत, अशी अपेक्षा करणे अवाजवी आहे. विद्यार्थिनींना रोडरोमिओ, टवाळखोरांच्या त्रासाला सामोरे जावे लागत असते. त्यांच्या विरोधात संबंधित मुलगी किंवा मुलीचे कुटुंबीयांनी पुढे यायला हवे. अशा घटनांचे व्हिडिओ शूटिंग करण्याला प्राधान्य देण्याऐवजी पीडित मुलीला वाचविण्याची जबाबदारी एक भारतीय नागरिक म्हणून आपलीच आहे, ही जाणीव ठेवणे गरजेचे आहे. 'बेटी बचाव'ला पुण्याने सुरुवात केली आहे. आता इतर राज्य, शहरांनीही अशीच सतर्कता दाखवावी एवढीच अपेक्षा.

## समृध्द संपन्न पितळखोरा लेणी.....!

इ स पूर्व तिसर्या शतकात प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी बाराबर टेकडीवर आजीवीक , जैन तसेच बौध्द तत्वज्ञानी आणि ईतर पंथांसाठी लेण्या तयार करून घेतल्या या लेण्यांचे स्वरूप एक हॉल सारखे होते इथे सर्व पंथ चारीका करून राहू शकत होते. या लेण्या एका विशिष्ट पंथासाठी नव्हत्या त्या सर्व पंथासाठी खुल्या होत्या मात्र प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे मांडलीकत्व स्वीकारलेले सातवाहन राज घराण्याने फक्त बौध्द धम्माच्या प्रचार आणि प्रसार करण्याऱ्या भिक्खू संघासाठी पावसाळ्याच्या दिवसात वर्षावासाठी महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेत असंख्य लेण्या खोदल्या, सातवाहन राज घरण्याच्या छत्र छाये खाली शेकडोनी लेण्या तयार झाल्या , लेण्या या खरंतर त्यांच्या काळातील आविष्कारच होता मैदानी स्तूपांना आता लेणीच्या मुख्य चैत्यगृहात स्थापित करण्यात आले होते पूर्वी फक्त हॉल असणाऱ्या लेण्यात आता तथागत सम्यक संबुध्द यांचे प्रतीक स्वरूप म्हणून स्तूपाची पुजा मुख्य चैत्यगृहात सुरू झाली होती.



महाराष्ट्रात खोदल्या गेलेल्या पहिल्या लेणीत प्रामुख्याने पितळखोरा लेणी, भाजे लेणी आणि अजिंठा मधी ९ व १० क्रमांकाची लेणी येते या तिन्ही लेण्या समकालीन आहेत , त्यात पितळखोरा लेणी प्रकाशझोता पासून अलिप्तच राहीली इ स पूर्व दुसर्या शतकापासून थेरवादी लेण्या पुढे खोदण्यात आल्या नंतर इ स पहिल्या दुसऱ्या शतकानंतर महायानी पंथाचा प्रभाव लेण्या पहायला मिळतो मग तो शिल्पकलेत जसा दिसतो तसा इ स पाचव्या शतकापासून भित्तीचित्रांच्या माध्यमातूनही पहायला मिळतो .

पितळखोरा लेणी तीच्या काळातील कलासंपन्न लेणी होती महाराष्ट्राला या लेणी आधी असे धार्मिक स्थापत्य अवगत नव्हते , पितळखोरा लेणीचे आज फक्त दगडातील अवशेष आपल्याला नजरेस पडतात ते ही भग्न स्थितीत कधी काळी पितळखोरा लेणी सुंदर लाकडी कोरीवकामने रंगीत भित्तीचित्राने, मौल्यवान अलंकाराने सुशोभित करण्यात आली होती पितळखोराच नव्हे महाराष्ट्रातील प्रत्येक लेणी ही याच पध्दतीने सुशोभित करण्यात आली होती.

अत्यंत उच्च कोटीची शिल्पकला, भित्तीचित्रे, काष्टशिलपे पितळखोरा लेणीत होती तसेच अन्य लेणीतही होती आज ती सर्व कलाकृती काळाआड गेली आहेत त्यांचे नैसर्गिक ह्यास झाले आहे , लाकुड हे माध्यमातून लवकर नष्ट होतो म्हणून आपल्याला लेणीत त्याचे अवशेष सापडत नाही अपवाद भाजे आणि कार्ला लेणी वगळता ईतर कोणत्याही लेणीत अवशेष शिल्लक नाही. महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील पितळखोरा लेणी आज जवळपास ७० % नष्ट झाली आहे उर्वरीत ३० % लेणी ही भग्न स्थितीत आहे मागिल काही वर्षांपासून या लेणीचा अभ्यास करतोय या लेणी विषयी खूप कमी लिखाण उपलब्ध आहे त्यातून पितळखोरा लेणी कशी दिसत असावी हे उपलब्ध असलेल्या चित्रांच्या माध्यमातून मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

भारतीय पुरातत्व खात्याने १९५८ साली मुख्य चैत्यगृहाच्या प्रांगणाचे उत्खनन केले आणि त्यात अनेक अमुल्य कलाकृती उघडकीस आल्या. पितळखोरा लेणी तीच्या उत्कर्षाच्या काळात कशी दिसत असावी हे पुनर्निमित करण्याचा प्रयत्न केला आहे.

१ क्रमांकाचे चित्र वर्तमान स्थितील आहे मुख्य चैत्यगृहातून पायर्या उतरून महाविहाराकडे जाणाऱ्या उजव्या बाजूला ९ गज शिल्प आहेत जी सजीव हत्तीच्या आकाराची आहेत या हत्तींना धरून प्रतेकी ९ अंकुशधारी माहूत उभे होते जे आज संपूर्णपणे नष्ट झाले आहेत फक्त त्यांच्या पायांचे अवशेष तिथे शिल्लक आहेत, या हत्तींच्या सोंडेच्या खालच्या भागात सुळ्यांच्या खोबणीत खरेखुरे हस्तिदंत रोवण्यात आले होते या सुळ्यांच्या खोबण्यांची पोकळी आजही आपल्याला पहायला मिळते तसेच पुढे महाविहारात प्रवेश करण्यासाठी जी दरवाज्याची चौकट आहे तिथे पुर्वी लाकडी दरवाजा होता जो आज नष्ट झाला आहे ही सर्वे तपशील आपल्याला २ क्रमांकाच्या चित्रात दिसून येतील.

३ क्रमांकाचे चित्र दूरवरून घेण्यात आले आहे आज महाविहार भग्न स्थिती दिसतो तो पूर्वी कसा होता ते चित्र क्रमांक ४ मध्ये दिसुन येइल.

महाविहारात प्रवेश करणार्या दोन द्वारपाल यांच्या मधल्या वरच्या भागात सिध्दार्थ गौतम यांची आई महामाया यांचे स्वप्न शिल्प स्थापित करण्यात आले होते जे काळ ओघात देखभाल अभावामुळे वरून गळून पडले जे आज छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय मुंबई इथे सुरक्षित जतन करून ठेवण्यात आले आहे.

गज शिल्प आणि द्वारपाल यांच्या वरच्या भागात संरक्षणासाठी कुंपण होते. लेणीच्या वरच्या भागातील गवाक्ष /फसाड यांचे कोरीव दगड तुटुन खाली संरक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या कुंपणावर तसेच हत्तींच्या रांगेवर गळून खाली पडले. त्यामुळे ही सर्व अमूल्य कलाकृती भग्न स्वरूपात लेणीच्या आवारात तग धरून उभी आहेत.

आज उपलब्ध असलेल्या पितळखोरा लेणीच्या फसाडच्या कोरीवकामाच्या अवशेषांवरूनच हे पुननिर्मित करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे आणखी सुक्ष्म पध्दतीने पितळखोरा लेणी पुन निर्मिती करण्याचा प्रयत्न राहील.

आपली भारतीय कला संपन्नता किती उच्च कोटीची होती हे मांडण्याचा छोटासा प्रयत्न, आशा करतो आपल्या पसंतीस उतरले असणार ,पितळखोरा लेणीवर अधिक प्रेम असल्याने वारंवार या लिखाण करतोय

..... **सूरज रतन जगताप**

पान १ वरुन

### हरित हायड्रोजन धोरण ..

३५अधिसंख्य पदांना मान्यता : नागपूर येथील शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्सच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी ३५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास येणार आहेत. या कर्मचाऱ्यांना कोणतीही वेतन थकबाकी पुर्वलक्षी प्रभावाने मिळणार नाही. यासाठी १ कोटी १७ लाख ३ हजार ४६८ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हे मुद्रणालय राज्य शासनाच्या विदर्भ विकास महामंडळाकडे सोपवण्यात आले होते. मात्र महामंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन १९९४ मध्ये ते शासकीय मुद्रण व प्रकाशन संचालनालयाकडे हस्तांतरित करण्यात आले होते.

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्र

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत नागपूर येथील कृषि महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी २२७ कोटी ४६ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या संदर्भात अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती.

**दिंडोरी, त्र्यंबक तालुक्यातील वळण योजनेस मान्यता**

* नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक तालुक्यातील कळमुस्ते आणि दिंडोरी तालुक्यातील चिमणपाडा येथील प्रवाही वळण योजना राबवण्यात येणार आहे.

* कळमुस्ते योजनेमुळे गोदावरी खोऱ्यातील पाणीसाठा १३.६८ किमीच्या बोगद्याद्वारे प्रवाही पद्धतीने वळविण्यात येईल. यामुळे गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तूट काही प्रमाणात भरून निघेल. यासाठी ४९४ कोटी ९८ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

* चिमणपाडा योजनेत पश्चिम वाहिनी नद्यांद्वारे अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवून, प्रवाही वळण योजनेद्वारे गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येईल. यामुळे करंजवण धरणातील १११ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होईल. या प्रकल्पासाठी ३६ कोटी ४० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन गावांना जमीन वाटप

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मौज आंबोली आणि गेळे या गावातील शेतकऱ्यांना कबुलायतदार गावकर पद्धतीत जमीन वाटप करण्यात येणार आहे. कबुलायतदार गावकर पद्धतीत महाराष्ट्रात अन्य कोणत्याही ठिकाणी अस्तित्वात नाही. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९७१ मधील तरतूद शिथील करण्यात आली आहे. आंबोली येथे ६२९-२४.४१ हेक्टर आर हे क्षेत्र प्रवर्ग १ मधील पात्र कुटुंबांना त्यांच्या घराखालील क्षेत्रासह, शेतजमीन शेतसारा आकारून समप्रमाणात वाटप करण्यात येईल. तसेच मौजे गेळे येथे २६०-२५.७० हेक्टर आर क्षेत्र पात्र कुटुंबांना समप्रणात वाटप करण्यात येईल.

बडय़ा उद्योजकांना फायदा ?

हरित हायड्रोजन योजना राज्य सरकारने मंजूर केली असली तरी त्याचा लाभ बडय़ा उद्योगपतींना होणार आहे. देशातील दोन मोठय़ा आघाडीच्या उद्योगपतींनी हरित हायड्रोजन क्षेत्रात उडी घेतली आहे.

संवर्धन केंद्रांच्या भाडेपट्टी कालावधीत वाढ

राज्यातील मत्स्यबीज, कोळंबीबीज उत्पादन व संवर्धन केंद्र यांच्या भाडेपट्टी कालावधीत वाढ करण्यात येणार आहे. या निर्णयानुसार विभागाकडील ७ केंद्रे वगळता भाडेपट्ट्याने देण्यात आलेली व नव्याने भाडय़ाने देण्यात येणारी मत्स्यबीज, कोळंबीबीज केंद्रांचा भाडेपट्टा कालावधी आता १५ ऐवजी २५ वर्षे करण्यात येईल. राज्यात ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्र, ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्र व २ कोळंबी बीज उत्पादन केंद्र व १ कोळंबी बीज संवर्धन केंद्र याप्रमाणे ६७ केंद्र स्थापन करण्यात आली होती.

### ८ जुलैपर्यंत देशातील अनेक ..

आली आहे. उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्ली येथे ६ ते ८ जुलै, दक्षिण भारतातील आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये ५ आणि ६ जुलै दरम्यान मुसळधार पाऊस पडू शकतो. यासोबतच ७ ते ८ जुलै रोजी झारखंड आणि पश्चिम राजस्थान तसेच गुजरातच्या काही भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, छत्तीसगड, उप-हिमाचल पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि उत्तर अंतर्गत कर्नाटकात पुढील ५ दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मान्सून सुरु झाल्यापासून दिल्लीत सतत पाऊस पडत आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, या आठवड्यातही दिल्लीत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. पावसानंतर काही भागात रस्त्यांवर पाणी तुंबले आहे. त्यामुळं नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आज राज्यातील कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं नागरिकांनी खबरदारी घ्यावी असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. पुढील दोन ते तीन दिवस कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भातही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

### माझ्या विचाराशी गद्दारी..

निवडणुकांना अजित पवार गटाविरोधात सामोरे जायचं, असा निर्णय पवारांनी घेतल्याचे सुत्रांनी सांगितले. आठ तारखेला नाशिकपासून सुरु होणाऱ्या दौऱ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे कार्यकर्त्यांना पवारांनी आदेश दिलेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना होर्डिंगवर शरद पवार यांचे फोटो लावण्याचे आदेश दिले..मात्र कोल्हापुरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी याला विरोध केला आहे. शरद पवार यांना त्रास देणाऱ्या अजित पवार यांनी शरद पवारांचा फोटो पोस्टरवर लावू नये, त्यांना नैतिक अधिकार नाही, अशा पद्धतीची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतली आहे. दरम्यान, अजित पवार यांनी आज नव्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन केले. या कार्यालयात शरद पवार यांचा फोटो लावण्यात आला आहे.

### थरारक! पेनल्टी शूटआऊटमध्ये ..

चॅम्पियनशिप म्हणजेच सॅफ फुटबॉल चॅम्पियनशिपवर भारताने नवव्यांदा नाव कोरले आहे. बंगलोर येथील श्री कांतीरवा फुटबॉल स्टेडियमवर पार पडलेल्या अंतिम सामन्यात भारताने बाजी मारली. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताने कुवेतचा पराभव केला. पूर्ण वेळ तसेच अतिरिक्त वेळेतही सामना १-१ अशा बरोबरीत सुटला होता. त्यामुळे सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआउटनंतर सडन डेथमध्ये लागला. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात अखेर भारतीय संघाने १-१ (५-४) असा विजय मिळवला. बेंगलोर येथे झालेल्या सामन्याच्या दोन्ही हाफमध्ये भारत आणि कुवेत संघाने प्रत्येकी एक एक गोल केला होता. ९० मिनिटानंतर कोणत्याही संघाला बाजी मारता आली नाही. त्यानंतर अतिरिक्त वेळ देण्यात आला. पण त्यामध्येही दोन्ही संघाला गोल करता आला नाही. सामना अखेर पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला. कर्णधार सुनिल छेत्री याने पेनल्टीमध्ये गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली होती. कुवेतनेही जोरदार पुनरामन करत ३-३ अशी लढत दिली होती. पण दबावात भारतीय खेलाळाडूंनी आपला खेळ उंचावला. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारतानेही ५-४ च्या फरकाने विजय मिळवला.

### अजित आगरकर निवड समितीचा ..

विक्रमही त्याच्याच नावावर आहे. २३ एकदिवसीय सामन्यात आगरकर याने ५० विकेट घेतल्या आहेत.

अजित आगरकर निवड समितीचा अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहे. तर शिवसुंदर दास, सुब्रतो बॅनर्जी, सलील अंकोला श्रीधरन श्रीनाथ हे निवड समितीचे सदस्य असतील. अजित आगरकर याने आतापर्यंत २६ कसोटी, १९१ वनडे आणि ४ टी २० सामन्यात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलेय. त्याशिवाय ४२ आयपीएलचे सामने खेळले आहेत. २०२१ मध्येही निवड समितीच्या अध्यक्षपदासाठी अजित आगरकर याच्या नावाची चर्चा होती. अजित आकरगर याने त्यावेळीही मुलाखत दिली होती, पण चेतन शर्मा यांच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली होती.

### राजकीय पक्ष आता त्यांचे वित्तीय ..

ऑनलाईन पद्धतीने दाखल करू इच्छित नाहीत, त्यांना ऑनलाईन पद्धत न अवलंबण्याचे कारण निवडणूक आयोगाला लिखित स्वरूपात कळवावे लागेल. त्यानंतर ते पक्ष विहित नमुन्यातील अहवाल सीडी किंवा पेन ड्राइव्हच्या माध्यमातून हार्ड कॉपीमध्ये दाखल करणे सुरू ठेवू शकतात. पक्षाने जर हे सर्व अहवाल ऑनलाइन भरले नाही तर, याबाबत पाठवलेल्या समर्थनकारक करणाऱ्या पत्रासह, सर्व अहवाल आयोग ऑनलाइन प्रकाशित करेल.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी अर्ज करण्याचे कृषि आयुक्तांचे आवाहन

पुणे : चालू खरीप हंगामामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. इच्छूक शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२३ पर्यंत प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या लाभासाठी अर्ज करावेत, असे आवाहन कृषि आयुक्त सुनील चव्हाण यांनी केले आहे.

योजनेमध्ये कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होता येईल. खरीप हंगामातील भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, कारळे, तीळ, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा अशा एकूण १४ अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल, मंडळ, क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल. सन २०२३-२४ पासून 'सर्वसमावेशक पिक विमा योजना' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतकरी हिस्स्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरुन पीक विमा पोर्टलवर नोंदणी करता येईल.

शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पीक विमा संरक्षण मिळण्यासाठी विहित मुदतीपूर्वी संबंधित बँक, http://pmfby.gov.in व आपले सरकार सेवा केंद्र यांच्यामार्फत विमा अर्ज करता येईल. कर्जदार शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज देणे आवश्यक आहे. कर्जदार योजनेत सहभागी होण्यास इच्छूक नसल्यास तसे विहित मुदतीत बँकेला लेखी कळविणे आवश्यक आहे.अहमदनगर, नाशिक, सोलापूर, जळगाव, सातारा जिल्ह्यासाठी ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि., परभणी, वर्धा व नागपूर जिल्ह्यासाठी आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि., जालना, गोंदिया व कोल्हापूर जिल्ह्यासाठी युनिव्हर्सल सोम्पो जनरल कंपनी लि., नांदेड, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., औरंगाबाद, भंडारा, पालघर व रायगड जिल्ह्यासाठी चोलामंडलम एम.एस. जनरल इ.कंपनी लि., वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदूरबार व बीड जिल्ह्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनी, हिंगोली,अकोला, धुळे, पुणे व उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एचडीएफसी जनरल इन्शुरन्स.कं.लि., यवतमाळ, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यासाठी रिलायन्स जनरल इन्शुरन्स व लातूर जिल्ह्यासाठी एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स या कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.

योजनेतील सहभागासंदर्भात शेतकऱ्यांना काही अडचण आल्यास तालुका संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तालुका कृषि अधिकारी, नजिकची बँक किंवा आपले सरकार सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही कृषि आयुक्तांनी केले आहे.

## राज्यात घाणेरड्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनीच केली; राज ठाकरेंचा हल्लाबोल

मुंबई : राज्यात झालेल्या सत्तानाट्यानंतर राज ठाकरे यांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला आहे. राज्यात जे काही झालं ते किळसवाणं आहे. राज्यात घाणेरड्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनीच केली असल्याचं ते म्हणाले. ते पुण्यात बोलत होते. जनमताचा कौल तुम्ही घेतला तर प्रत्येक घरामध्ये शिव्या ऐकायला येतील दुसरे काही ऐकायला येणार नाही, असं म्हणत त्यांनी राज्यातील सत्तानाट्यावर संताप व्यक्त केला आहे.'हे सगळं शरद पवारांनीच घडवून आणलं असल्याची शंका आहे. त्यात महत्वाचं म्हणजे प्रफुल्ल पटेल , दिलीप वळसे पाटील आणि छगन भुजबळ ही माणसं अजित पवारांसोबत जाणारी नाहीत. त्यामुळे ही तीन माणसं या सत्तानाट्यात संशयास्पद वाटतात. त्यात अजित पवारम्हणाले होते की, सगळ्या होर्डिंग्ज् शरद पवारांचे फोटो लावा. त्यामुळे हे सगळं अनाकलनीय असल्याचं ते म्हणाले. 'हे सत्तानाट्य अचानक घडलं नाही. याची चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु होती. त्यात काल ती सगळ्या महाराष्ट्रासमोर आली',असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. 'या सत्तानाट्यावर बोलण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. त्यामुळे मेळाव्यात या सगळ्या गोष्टी मी स्पष्ट करेन', असंही ते म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

आरोग्याची वारी पंढरीच्या दारी

# पालखीमार्ग व पंढरपूरच्या महाशिबिरात ११ लाख ६४ हजार ६८४ भाविकांना मोफत आरोग्य सुविधा

## आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार यांची माहिती

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरकडे निघालेल्या दिंड्यांमधल्या वारकर्यांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात तसेच पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून तपासण्या व उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी आरोग्य विभागाकडून 'आरोग्याची वारी - पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून पालखी मार्ग तसेच पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरद्वारे ११ लाख ६४ हजार ६८४ वारकर्यांना मोफत आरोग्य सुविधा देण्यात आल्या असल्याची माहिती आरोग्य उपसंचालक राधाकिशन पवार यांनी दिली.

आषाढी वारी २०२३ साठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली देहू - आळंदी ते पंढरपुर पर्यंत आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या तसेच पंढरपूर येथे २७ ते ३० जून या कालावधीत वाखरी, गोपाळपूर, तीन रस्ता येथे महाआरोग्य शिबिरं घेण्यात आली. याबरोबरच वाळवंटात ३ व ६५ एकर येथे २ तर पंढरपूर शहरामध्ये १७ असे एकूण २० ठिकाणी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

देहू-आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गावर एकूण ६ लाख ६४ हजार ६०७ वारकर्यांना मोफत तपासणी व उपचार देण्यात आले. पालखी मार्गावर प्रत्येकी दोन किलोमीटर अंतरावर तात्पुरता आपला दवाखाना या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या. तसेच १९४ रुग्णवाहिकांमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.

अत्यावश्यक रुग्णसेवेसाठी ७५ रुग्णवाहिका तैनात होत्या या मार्फत १९ हजार ८५३ वारकर्यांना सेवा देण्यात आली. त्यापैकी ८४७ अत्यावश्यक वारकर्यांना योग्यवेळी उपचार व संदर्भ सेवा मिळाल्याने प्राण वाचले आहे. त्यामुळे मृत्यूंच्या प्रमाणात घट झाली. आरोग्यदुतांमार्फत १२४ बाईक अँम्बुलन्सने पालखी मार्गावर आरोग्य सेवा दिली. पुणे परिमंडळ व पुणे जिल्हा परिषदस्तरावरुन पालखी बरोबर ९ आरोग्य पथके अविरत पालखी माघारी जाईपर्यंत कार्यरत आहेत. आरोग्य उपसंचालक डॉ.पवार यांनी सांगितले.

वारकरी भाविकांना एकाच ठिकाणी आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी आषाढी वारीकाळात पंढरपूर येथे वाखरी, गोपाळपूर तीन रस्ता येथे २७ ते ३० जून या कालावधीत महाआरोग्य शिबिरे घेण्यात आली होती. या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून पाच लाख ७७ हजार भाविकांना रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे आरोग्य संचालक डॉ.राधाकृष्ण पवार यांनी सांगितले.

अतिदक्षता विभाग कक्षामार्फत १५४ वारकर्यांना तसेच ४ हजार २१७ वारकर्यांना आंतररुग्ण विभागात आरोग्य सुविधा देण्यात आली. या शिबिरात ४० प्रकारच्या रुग्णांच्या मोफत प्रयोगशाळा तपासण्या पूर्ण केल्या असून, रुग्णांचा प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल रुग्णांच्या मोबाईलवर देण्यात आलेला आहे. रुग्णांना अति विशेषतज्ज्ञ मार्फत ऑन्कोलॉजी, न्युरोसर्जरी, गॅस्टोईट्रॉलॉजी यासारख्या वैद्यकीय सेवा मोफत पुरविण्यात आलेल्या आहेत. मोफत नेत्र तपासणी करून ७७ हजार ८५४ चष्मे वाटप करण्यात आले. तसेच मोतीबिंदू झालेल्या रुग्णांची यादी करुन मोफत शासकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिराच्या ठिकाणी ५ बेड मनुष्यबळासह अतिदक्षता विभाग कार्यरत होते, त्यामध्ये १५४ रुग्णांना सेवा दिली व वारकर्यांचे प्राण वाचविण्यात आले. तसेच अत्याधुनिक रेडिओ डायग्नॉस्टिक सुविधा, यामध्ये सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करण्यात आली होती, असेही डॉ. पवार यांनी सांगितले

या महाशिबिरातून नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग, कॅन्सर या सारख्या रोगावर मोफत उपचार केलेले आहेत. ज्या वारकर्यांना शस्त्रक्रिया व सुपरस्पेशालिटी सेवाची आवश्यक्ता होती, त्यांची यादी करण्यात आली असून या सर्वांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.महाआरोग्य शिबिामध्ये विषयतज्ज्ञ, एमबीबीएस व पॅरामेडिकल स्टाफ यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ३ हजार ७१८ व एक हजार खासगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच भैरवनाथ शुगर्स व जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे १ हजार ५०० स्वयंसेवक अशा एकूण ६ हजार २१८ मनुष्यबळामार्फत मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे.

# वेतन पथकाचे काम पारदर्शक पध्दतीने केले जाईल

**आजही भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक नाशिक जिल्ह्यातील १०० कोटींची फरक बिले अडकून आहे. त्यात ३३ कोटींची बिले शालार्थ चौकशीत* शिक्षण उपसंचालक कार्यालयात अडकून पडली आहेत. उर्वरित बिले निधी अभावी मिळेनाशी झाली आहे तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजा रोखीकरणाची बिले ट्रेझरीमध्ये किरकोळ त्रुटीमुळे पडून आहेत.**

निफाड/नितीन पाटील : नासिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नितीन पाटील अधीक्षक वेतन पथक नाशिक यांची भेट घेतली असून विविध समस्या त्यांच्यासमोर मांडल्या व पाटील यांनी वेतन पथकाचे काम पारदर्शक पद्धतीने केले जाईल असे आश्वासन दिले

नुकताच नाशिक भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक माध्यमिक या कार्यालयाचा कार्यभार नितीन पाटील यांनी स्विकारला असून. वेतन पथक कार्यालय हे आतापर्यंत वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत राहिले आहे.शिक्षकांचे पगार,मेडिकल बिले,फरकांची बिले, पी.एफची बिले या कारणांनी सतत शिक्षक, *शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा रोष (नाराजी)या कार्यालयावर राहिला असून. नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अधिक्षक नितीन पाटील यांची भेट घेतली व गेल्या ५-६ वर्षापासूनचा कर्मचाऱ्यांचा रोष (नाराजी) या कार्यालयावर कसा आहेत ते सांगितले व यापुढे आपण पारदर्शक कामकाज करावे आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात व शाळांवरचा एकही लिपिक आपल्या कार्यालयात ठेवू नये व त्या शाळांची अडचण करू नये आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडूनच `पश्नळपश ची कामे करून घ्यावी.यावर नितीन पाटील म्हणाले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करणे,वेतन १ तारखेला होईल याला प्राधान्य देणे,एन.पी.एस. डी.सी.पी.एस. स्लिपा तयार करणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचे अँट्याज डीटयांज प्रकरणे मार्गी लावणे, परतावा न परतावा प्रकरणे,निकाली काढणे,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची थकीत फरक बिले,मेडिकल बिले,यांचा शासनाकडे पाठपुरावा करून ती कर्मचाऱ्यांना मिळवून देणे.मुख्याध्यापक ,लिपिक यांना कार्यालयात सन्माणाची वागणूक देणे.दप्तर दिरंगाई होणार नाही याची पुरेपूर काळजी घेणे ही कामे प्राधान्य क्रमाने केली जातील असे नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस.बी.देशमुख व उपाध्यक्ष प्रदीप सांगळे यांना नितीन पाटील यांनी सांगितले. यावेळी कार्यालयातील लेखाधिकारी राजीव जाधव,मुख्य लिपिक एस.एस. चौधरी, लिपिक शेखर पाटील, एल.आर. जहागीरदार, बी.एन. हांडोरे,श्रीमंत जी.डी. यांच्यासह कार्यालातील सौ. देशपांडे, सौ.लोळगे,श्री. सांगळे, राजेंद्र मणियार,श्रीमती कडू हे कर्मचारी हजर होते. यावेळी मुख्याध्यापक संघाचे सचिव एस.बी.देशमुख यांनी नितीन पाटील यांना सत्कार व शुभेच्छा दिल्या.

# पंढरीतील पोलीस कर्मचाऱ्यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमध्ये काम करत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी यात्रा कालावधीमध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात करण्यात आला.पंढरपुरातील काही पोलीस कर्मचारी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आपली सेवा बजावत आहेत त्याचबरोबर दर्शनासाठी होणाऱ्या भाविकांना पोलीस अधीक्षक शिरीष कुमार सरदेशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव पंढरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले उत्सव पोलीस उपविभागी विक्रम कदम मंदिर समितीचे पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांना योग्य मार्गदर्शन करणे मंदिर व भाविक सुरक्षिततेच्या बाबतीत स्वतःच चर्चा करणे गरजेच्या ठिकाणी मार्गदर्शन करून योग्य नियोजन करणे इत्यादी कामे केल्याबद्दल पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोरे पोलीस मनेरी पोलीस हवालदार तावशी वसई वाघमारे पोलीस हवालदार रासकर व सर्व पोलीस विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने भगवे उपरणे श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला शेटे पोलीस हवालदार श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने पोलीस भावाचा सन्मान केल्याबद्दल पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे

# स्वेरीच्या आठ विद्यार्थ्यांची 'टेक महिंद्रा' या कंपनीत निवड, स्वेरीच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या सुवर्णसंधी

पंढरपूर/प्रतिनिधीः 'टेक महिंद्रा' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या कॅम्पस निवड प्रक्रियेतून श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली. 'टेक महिंद्रा' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून विठ्ठल अशोक शिरसाळे, रूपम रेवणनाथ मुळूक, वैष्णवी दिगंबर वाळके, वेदांगी मंगेश भुजंग, ऋषिकेश प्रसाद लोहार, भुषण सतीश देशमुख, राहुल लक्ष्मीकांत हिंगमिरे व स्वप्निल कांतीलाल उबाळे या आठ विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. ३.५ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंट साठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# खानापूर व चिंचोळी न येथे लववकरच उभारणार बुद्ध विहार : ना.आठवले




अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील चिंचोळी ( न) आणि खानापूर येथे बुद्ध विहार बांधण्यात यावे या मागणीसाठी अक्कलकोट तालुक्यातील खानापूर तसेच चिंचोळी न येथील कार्यकर्त्यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची भेट घेतली आणि त्यांना वरील मागणीचे निवेदन दिले, केंद्रीय मंत्री मा.श्री रामदास आठवले साहेब यांना कोळी समाजाची शिष्ट मंडळाचे मिटिंग केंद्रीय आदिवासी मंत्री यांचाशी लाववी म्हणून व खानापूर व चिंचोळी (न ) या गावात बुध्द विहार साठी निधी मागणीचे निवेदन देण्यात आले यावेळी चिंचोळी (न) चे सरपंच करण शिंदे व बसवराज कोळी खानापूर हे उपस्थित होते. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी या कार्यकर्त्यांची भेट घेतली आमी त्यांचे निवेदन स्वीकारले आणि या कामाबाबत लवकरच आदिवासी विकास मंत्री यांच्या शी बैठक लावली जाईल असे सांगून चिंचोळी न येथे आणि खानापूर येथे बुद्ध विहार बांधण्यासाठी तातडीने पाऊल उचलले जाईल असे आश्वासन दिले आणि आलेल्या सर्व कार्यकर्त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांची सर्व सोय करून दिली आणि त्यांच्या कामात काही अडचणी येणार नाहीत याकडे लक्ष देण्याचे आदेश आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांना दिले.

# समाधानी जीवनास स्वामींच्या नामस्मरणाची गरज : भाऊ कदम

अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वामींचा साक्षात्कार सर्व ठिकाणी आहे, सर्व विश्व व्यापून आहे. मग त्याच्या अस्तित्वाची जाणीव प्रत्येकाला होण्याकरीता काय करावे ? याचे उत्तर म्हणजे स्वामी भक्तीत ज्याची भावना प्रगल्भ झाली असेल, त्यालाच स्वामींचे अस्तित्व जाणवेल म्हणून तशी भक्ती भावना मनी असावे आणि ती उत्पन्न होण्यासाठी स्वामी समर्थांचे नामस्मरण करण्याची आवश्यकता आहे. असे केल्याने समाधानी जीवन लाभून जीवन प्रसन्नतेने फुलून जातं, त्यामुळे समाधानी जीवनास स्वामींच्या नामस्मरणाची गरज असल्याचे मनोगत प्रसिद्ध मराठी हास्य कलाकार व मराठी सिरीअल चला हवा येऊ द्या फेम भाऊ कदम यांनी व्यक्त केले. तेनुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी भाऊ कदम यांचा स्वामी समर्थांचे कृपा वस्त्र प्रसाद प्रतिमा देऊन सन्मान केला याप्रसंगी भाऊ कदम बोलत होते याप्रसंगी मंदिर समिती सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, संतोष जमगे, प्रसाद पाटील, प्रा.शिवशरण अचलेर, संजय पवार, चंद्रकांत गवंडी इत्यादी उपस्थित होते.



## शब्दकोडे क्र ४९



आडवे शब्द १. महाराष्ट्रात यापूर्वी सत्तेवर असलेले दोन राजकीय पक्ष ९. स्थान ११. मंद तेजाने गाभारा उजळणारी १२. लांबवर खणलेला खड्डा १३. फोफावणे, सुजणे १४. नवरा १७. नट घट्ट करणारे हत्यार १८. त्रयस्थ १९. अगदी थोडा २०. हालचाल २३. तल्लीन, गुंगलेला २४. वाहणारी हवा २५. मृत्यूदेवता २७. शक्ती २९. १९४२ सालची चळवळ
३१. आत्या ३३. अगतिक ३५. वृक्ष ३६. चिकटविण्याचे साधन ३८. पात्याची हालचाल ४१. ख्रिश्चन प्रार्थनास्थळ ४२. तळे ४३. शेंगेचे आवरण ४७. आर्शीवाद ४८. दया ५०. सह, बरोबर ५१. प्राणी ५२. कमळ, मुलीचे एक नाव ५३. चावा घेऊन तोडलेला मोठा तुकडा ५५. लावणीत भावजींचा जोडीदार ५६. च्या सह ५८. नशीब (इंग्रजी) ६०. जुलमी माणूस ६३. व्रत ६५. सापाची विषारी जात ६७. विष्णु ६९. वेदना ७०. कोंब ७२. मिरवणूक ७३. त्वरेने, तात्काळ ७४. कौशल्य, विद्या ७६. अर्क ७८. सबब ७९. श्रीमंत ८०. त्वरित ८१. मुंबईतील एक उपनगर

उभे शब्द १. लालूप्रसादांच्या पक्षाचे पूर्ण नाव २. दिवंगत कवी माणिक गोडघाटे यांचे टोपणनाव ३. सपाट ४. मोहरी ५. ग्रंथालय ६. नवऱ्याचा भाऊ ७. जास्त मोठा (इंग्रजी) ८. शासन ९. विनाशक तंत्रमंत्र १०. गीत १५. वृद्धत्व १६. मत्स्य १७. बटाटेवड्याबरोबरचा एक चतुर्थांश! २०. सृष्टी २१. नुकतेच जन्मलेले २२. नमन २६. आय-व्यय २८. व्यापारातला मध्यस्थ ३०. पर्जन्यदेवता ३२. माराची खूण ३४. वाह्यात, वात्रट ३७. सुमारे, शेजारी ३९. चप्पल ४०. पुरेसा ४१. आंदोलन ४२. शोध ४४. ताप ४५. थरथरणे ४६. सध्या ४८. उकिरडा ४९. प्राणी इ. जंगलचे रहिवासी ५४. शूर पुरुष ५७. न्यून ५९. तपकिरी, पांढुरका ६०. भाग, सूक्ष्म भाग ६१. नकला करणारा ६२. वेळ ६४. दक्षतेचा इशारा ६६. सामूहिक आक्रोश ६८. दहावी रास ७१. रत्न ७५. जंगलात पसरणारी आग ७७. नेहमी

# ‘आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी’ अंतर्गत ११ लाखाहून अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी



पुणे/प्रतिनिधीः आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर दरम्यान निघालेल्या पालखी मार्गावर ६ लाख ६४ हजार ६०७ तर पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये ५, लाख ७७ अशा एकूण ११ लाख ६४ हजार ६८४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरवून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने विक्रमी कामगिरी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली देहु-आळंदी ते पंढरपुर या पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी २७ ते २९ जून २०२३ या कालावधीत वाखरी, गोपाळपुर व ३ रस्ता येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करून आरोग्य विभागामार्फत विविध आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या. मंदिर परिसरामध्ये, वाळंवट ठिकाणी ३ व ६५ एकर येथे १ ’हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’ या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १० बेड क्षमतेच्या अतिदक्षता विभागासह सेवा पुरविण्यात आल्या. पंढरपूर शहरामध्ये १७ ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. देहु-आळंदी ते पंढरपुर या पालखी मार्गावर एकूण ६ लाख ६४ हजार ६०७ वारकऱ्यांना मोफत तपासणी व उपचार करुन आरोग्य सेवा पुरविण्यात आली. प्रत्येकी दोन किलोमीटर अंतरावर २३३ तात्पुरत्या ’आपला दवाखाना’ मार्फत मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या. पालखी मार्गावर २४७ अशा एकूण १९४ आणि अत्यावश्यक रुग्ण सेवेसाठी १०८ च्या ७५ रुग्णवाहिकांमार्फत १९ हजार ८५३ वारकऱ्यांना सेवा देण्यात आल्या. त्यापैकी ८४७ अत्यावश्यक वारकऱ्यांना योग्य वेळी उपचार व संदर्भ सेवा देऊन प्राण वाचविण्यात आले.

पुणे परिमंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन पालखी बरोबर एकूण ९ आरोग्य पथके अविरत पालखी परतेपर्यन्त कार्यरत आहेत. १२४ आरोग्यदुतांमार्फत बाईक म्बुलन्सने पालखी मार्गावर आरोग्य सेवा पुरविण्यात आली. ३ हजार ५०० औषधी किटचे दिंडी प्रमुखांना मोफत वाटप करण्यात आले. पालखी मार्गावरील ७ हजार ४६० हॉटेल्स मधील १० हजार ४५० कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी करण्यात आली.

पालखी मार्गावर १५६ टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्यात आला. तसेच पालखी व मुक्कामाच्या ठिकाणी धुर फवारणी, पाण्याच्या सर्व स्त्रोतांचे ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थंमार्फत जैव कचरा विल्हेवाट करण्यात आली. यामुळे पालखी मार्गावर जलजन्य व किटकजन्य उद्रेक झाला नाही.

पंढरपुर येथील ३ महाआरोग्य शिबीरामध्ये २७ ते ३० जून दरम्यान ५ लाख ७७ लोकांची मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार करण्यात आले.

महाआरोग्य शिबिरामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ३ हजार ७१८ तज्ज्ञ डॉक्टर्स व ५०० खासगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच स्वयंसेवी संस्थांचे १५०० स्वयंसेवक अशा एकूण ५ हजार ७१८ मनुष्यबळामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.

नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग (क्षयरोग, कुष्ठरोग), कॅन्सर यासारख्या रोगाबाबत तपासणी करून उपचार करण्यात आले. शस्त्रक्रिया आणि विशेषोपचार सेवेची आवश्यकता असणाऱ्या वारकऱ्यांची यादी करण्यात आली असून सर्वांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

-महाशिबिरातून रुग्णांच्या मोफत ४० प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या पूर्ण केलेल्या असून, रुग्णांचा प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल रुग्णांच्या मोबाईलवर देण्यात आलेला आहे. रुग्णांना अतिविशेषतज्ञ मार्फत ऑन्कोलॉजी, न्युरो सर्जरी, गॅस्टोईट्रॉलॉजी यासारख्या वैद्यकीय सेवा मोफत पुरविण्यात आलेल्या आहेत. मोफत नेत्र तपासणी करून ७७ हजार ८५४ चष्मे वाटप करण्यात आले. मोतीबिंदू झालेल्या रुग्णांची यादी करुन मोफत शासकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

प्रत्येक शिबिराच्या ठिकाणी ५ बेड मनुष्यबळासह अतिदक्षता विभाग कार्यरत होते, त्यामध्ये १५४ रुग्णांना सेवा पुरवण्यात आली व वारकऱ्यांचे प्राण वाचविले. अत्याधुनिक रेडिओ डायग्नॉस्टीक सुविधा, यामध्ये सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करण्यात आली होती.

उपचार व आरोग्य तपासणीसाठी येणाऱ्या सर्व भाविकांना मोफत अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. मंदिर परिसरामध्ये आरोग्य दूतांमार्फत गर्दीच्या ठिकाणी बाईक म्बुलन्सची सोय करण्यात आली होती. महाआरोग्य शिबिराकरीता ईएमएस १०८ च्या १५ रुग्णवाहिका व आषाढी वारीसाठी १५ रुग्णवाहिका मंदिर परिसरामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळासह सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शिबिराला भेट देऊन रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती घेतली व रुग्णांशी, डॉक्टर, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला.

रुग्णांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची त्यांनी प्रशंसा केली व उत्कृष्ट नियोजनाबद्दल आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे कौतुक केले. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सरकार आरोग्यासाठी विविध योजना राबवित आहे याचा सामान्य माणसाला फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला

## ओबीसी महामंडळाची एकरक्कमी परतावा योजना

# थकबाकीदार लाभार्थ्यांनी लाभ घेवून कर्जमुक्त होण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रक्कमेत टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा (ओटीएस) योजना दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत राबविण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने महामंडळाच्या योजनेतील थकबाकीदार लाभार्थींनी योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थपक यांनी केले आहे. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयासभेटद्यावी.

# सुनील सोनटक्के यांनी घेतला सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा पदभार



सोलापूर/प्रतिनिधीः कोल्हापूरचे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी आज सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा पदभार घेतला आहे. सोनटक्के यांनी यापूर्वी जळगांव माहिती अधिकारी, हिंगोली जिल्हा माहिती अधिकारी, लातूर जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार तसेच लातूर व कोल्हापूर विभागाचा अतिरिक्त उपसंचालकाचा पदभार यशस्वीपणे सांभाळला आहे. यावेळी सोलापूर जिल्हा माहिती कार्यालयात वरिष्ठ लिपिक अविनाश गरगडे, शरद नलावडे, मिलिंद भिंगारे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी लिपीक संजय घोडके, वाहनचालक भाऊसाहेब चोरमले, अनिल नलवडे उपस्थित होते.

# रोपळेतील शेतकऱ्याच्या केळीला इराणमध्ये मार्केट

**युवा शेतकरी हनुमंत शितोळे यांच्या केळीची निर्यात**

**पाच एकर केळी बागेतून भरघोस उत्पन्न**

**७० टन केळीची निर्यात तर २२५ टन एकुण केळची अपेक्षा**

**४ पंढरपूर ०४ : केळीच्या बागेमध्ये केळी पीकासह शेतकरी हनुमंत शितोळे .**

**४ पंढरपूर ०५ : हनुमंत शितोळू यांच्या केळी पीकाची निर्यातीसाठी प्रतवारी करताना कामगार .**



पंढरपूर/प्रतिनिधीः भारत हा कृषी प्रधान देश असून जगातील अनेक देशांमध्ये भारताचे अन्नधान्य निर्यात होत असते. त्यामुळे देशातील शेती प्रयोगशिलतेचे कौतुक होत असून यामध्ये ग्रमीण भागातील अनेक प्रयोगशील शेतकर्यांचा मोठा वाटा असल्याचे दिसून येत आहे. याचीच प्रिचत पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील युवा शेतकरी हनुमंत भारत शितोळे यांच्या माध्यमातून आली असून त्यांची केळी पिकाला इरान देशामध्ये मोठे मार्केट मिळाले आहे. यामुळे या युवा शेतकर्यांच्या केळीच्या यशस्वी प्रयोगाला महत्व प्रप्त झाले आहे.

याबाबत शेतकरी हनुमंत शितोळे म्हणाले की जी९ या जातीच्या केळीची २ ऑगस्ट २०२२ रोजी पाच एकर क्षेत्रावर लागवड केली. यासाठी दोन ओळीतील अंतर सहा फुट तर दोन रोपांमधील आंतर पाच फुट धरले. तर लागवडीपुर्वी एकरी सहा डंपिंग शेणखत व कांदा विस्कटला होता. त्यानंतर सुमारे २० ते २५ दिवसांनी केळीची लागवड केली. त्यानंतर केळीच्या रोपांची पांढरी मुळी चालावी यासाठी ह्युमीक सीड सोडण्याचे नियोजन केले होते.

पीकशास्त्राच्या दृष्टीकोनातून केळी पीकाला योग्य जीवनद्रव्ये मिळविण्यासाठी सुक्ष्म नियोजनाची गरज असते. त्यानुसार लागवडी नंतर काही दिवसांनी केळीची वाढ व्हावी यासाठी दर आठ दिवसाला १९:१९ ची फवारणी करण्यात आली. त्यानंतर पीकाच्या संरक्षणासाठी बुरशीनाशके व किटकनाशकांची अवश्यकतेनुसार फवारणी केली. तरी लागवडीस तीन महिने पुर्ण झाल्यानंतर पावर ट्रीलरच्या सहय्याने बांधणी करून बेलस्ट डोस देण्यात आला. त्यानंतर सलग दोन महीने प्रत्येक आठ दिवसांनी एकरी पाच किलो याप्रमाणे १३:०:४५ ड्रीपव्दारे सोडले. या सर्व नियोजनबध्द औषध सोडण व फवारणीमुळे केळीच्या झाडांना बळकटी येवून त्यांची वाढ चांगल्या प्रकारे झाली.

केळीची वेण होताना ड्रोनव्दारे फवारणी करून पीकाची रोगराईपासुन संरक्षण केले.

त्यानंतर केळीची फळ फुगणे व चकाकी येण्यासाठी एकरी पाच किलो प्रमाणे ०:६०:२० ची मात्र सोडली. या सर्व खतमात्रा दिल्यामुळ केळीच्या घडांची वाढ योग्य व वेगाने होण्यास मदत झाली. सध्या बागेमध्ये ३२ ते ४० किलो वजनाचे घड आहेत. तर ५५ किलो वजनाचा सर्वात मोठा घड बागेमध्ये उत्पादीत झाला आहे.

### आतापर्यंत तेरा लाखाचे उत्पन्न, तीस लाखाची अपेक्षा......

पाच एकर केळी बागेतून निवडून आतापर्यंत ७० ते ८० टन केळी बाजारात पाठवीली आहे. त्यास सुमारे १७ ते २० रूपये प्रित किलो प्रमाणे दर मिळाला आहे. यापैकी सुमारे ७० टन केळी ही इरानच्या बाजारपेठेमध्ये पाठवीली असून त्यास तेथे चांगली बाजारपेठ मिळाली आहे. यातुन आतापर्यंत सुमारे १३ ते १४ लाख रूपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर बागेमध्ये अद्यापही भरपूर केळी शिल्लक असून सुमारे २२५ टन एकुण केळी या पाच एकराच्या केळी बागेतून उत्पादन मिळेल अशी अपेक्षा असून सुमारे तीस लाख उत्पन्न मिळण्याची अपेक्षा शेतकरी हनुमंत शितोळे यांना आहे.

### चांगले भरघोस उत्पन्न देणारे पीक.....

शेतकर्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी केळी हे उत्तम पीक असून ऊसापेक्षाही दुप्पट, तीपट्ट उत्पन्न यामध्ये मिळु शकते. यासाठी शेतकर्याच्या सकारात्मक मानसिकतेची गरज असून थोडे नियोजनाचे कष्ट जास्त घेतल्या केळी पीकाचे उत्पादन वाढीचा प्रयोग यशस्वी होण्यास कोणतीही हारकत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकर्यांनी केळी पीकाकडे ओळावे. **– हनुमंत भारत शितोळे, केळी उत्पादक शेतकरी रोपळे ता.पंढरपूर**

# श्री साईबाबा संस्थान वतीने गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता, काल्याच्या किर्तनानंतर दहिहंडी कार्यक्रम संपन्न




शिर्डी :श्रीी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने सुरु असलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता ह.भ.प.डॉ.प्रज्ञा देशपांडे-पळसोदकर, आंबेगांव, पुणे यांच्या काल्याच्या किर्तनानंतर दहिहंडी फोडुन झाली.

उत्सवाच्या सांगता दिनी सकाळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.शिवा शंकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.सुप्रिया यांनी समाधी मंदिरात श्रींची पाद्यपुजा करून, गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक पुजा केली. काल्याच्या किर्तनानंतर दहिहंडी फोडण्यात आली. यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.शिवा शंकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल जाधव, प्रशासकीय अधिकारी डॉ.आकाश किसवे, प्रज्ञा महांडुळे, संरक्षण अधिकारी आण्णासाहेब परदेशी, मंदिर प्रमुख रमेश चौधरी, प्र. जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर श्रींची माध्यान्ह आरती झाली. सायंकाळी वाजता धुपारती झाली. संजीव कुमार, पुणे यांचा भजन संध्या (भक्त गीते) हा कार्यक्रम हनुमान मंदिरा शेजारील श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपातील स्टेजवर झाला. यासर्व कार्यक्रमांना श्रोत्यांनी उत्स्फुर्त दाद दिली. श्रींची शेजारती झाली.

श्री गुरुपौर्णीमा उत्सवात मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणारे साई राज डेकोरेटर्स, मुंबई सदस्यांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी विद्युत विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

हा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, तदर्थ समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी

श्री.सिध्दाराम सालीमठ व मुख्य कार्यकारी अधिकारी पी.शिवा शंकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशासकीय अधिकारी डॉ.आकाश किसवे, प्रज्ञा महांडुळे, दिलीप उगले, डॉ. शैलेश ओक, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, संरक्षण अधिकारी आण्णासाहेब परदेशी, सर्व विभागप्रमुख व सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



गुरू पौर्णिमेचे औचित्य साधून स्वामी भक्तांसाठी जुन्या राजवाड्यातील श्री स्वामी समर्थांच्या पादुका व सूर्यमणी चे दर्शन अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे संयुक्ताराजे भोसले यांनी संस्थांनकालिन श्री पंचायतन गणेश मंदिर , अक्कलकोट संस्थान येथे आयोजित केले होते .

यावेळी ’अनादी अनंत’ हा दत्तभक्तीगीतांचा नवीन कार्यक्रम पार पडला असून, या प्रयोगाला महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध मठांचा आशीर्वाद लाभला आहे. या कार्यक्रमात संगीतकार आदित्य बर्वे, गायक-संगीतकार केदार फडके, गीतकार-निवेदक अंबरीष देशपांडे या सिने-पार्श्वभूमी असलेल्या कलाकारांचा विशेष सहभाग होता ....